दै. सकाळ 19-12-2022

# अर्धापुरात वाटमारी करणारे सहा अटकेत

## पोलिसांनी २४ तासांच्या आत ओरोपींना केले गजाआड : तीन दिवसांची पोलिस कोठडी

**अर्धापूर, ता.१८ (बातमीदार)** : वाटमारीची घटना झाल्यानंतर आरोपींना २४ तासांच्या आत गजाआड करण्याची कामगिरी अर्धापूर पोलिसांनी रविवारी (ता.१८) केली आहे. अर्धापूर - पार्डी रस्त्यावरील शेणी पाटीजवळ दुचाकीवरून पाठलाग करत अज्ञात सात आरोपींनी दुचाकीस्वारास मारहाण करून खंजीरचा धाक दाखवून मोबाईल व एक हजार सातशे रुपये हिसकावून घेतले व फरार झाले होते. ही वाटमारीची घटना शनिवारी (ता.१७) रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास घडली होती. यातील सहा आरोपींना आरोपींना मालेगाव - नांदेड रस्त्यावरील सरपंच नगर पाटीजवळ पोलिसांनी सापळा रचून रविवारी अटक केली. तर एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला.

यातील सर्व आरोपी अर्धापूर तालुक्यातील आहेत. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

या बाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहिती अशी की पार्डी येथील माधव बालाजी अन्नपूर्णे हे अर्धापूर शहरातील एका दुकानात काम करतात. त्यांनी शनिवारी दिवसभर काम करून आपल्या दुचाकिवरून रात्री गावाकडे जाताना त्यांचा दोन दुचाकीवरून सात जणांनी पाठलाग करून शेणी पाटी जवळ ओव्हरटेक करून पावने दहाच्या सुमारास अडवले. आरोपींनी मारहाण करून खंजीरचा धाक दाखवून माधव अन्नपूर्णा यांच्या खिशातील एक हजार सातशे व सात हजारांचा मोबाइल लंपास केला अशी फिर्याद माधव अन्नपूर्णे यांनी अर्धापूर पोलिस ठाण्यात दाखल केली होती.

या घटनेचा तपास करण्यासाठी पोलिस निरीक्षक अशोक जाधव, पोलिस उपनिरीक्षक कपील पाटील साईनाथ सरवसे यांनी जलदगतीने सुत्रे हलवली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मालेगाव - नांदेड रस्त्यावरील सरपंच नगर पाटीजवळ सहा आरोपींना ताब्यात घेतले. यात आकाश दिगांबर पारवे (वय २०), गणेश बालाजी राजेगोरे (वय २३), वैभव सुभाष राजेगोरे (वय २०) सर्व राहणार शैलगाव ता. अर्धापूर), मन्मथ पुंडाजी मोरे (वय २३ रा. देळुब), गणेश भिमराव नवले (वय २१ रा. मेंढला खुर्द), ज्ञानेश्वर उर्फ गणेश व्यंकटी वानखेडे (वय २५) यांना अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक साईनाथ सुरवसे हे करित आहेत.

दै. पुण्यनगरी 19-12-2022

# तीन जुगारी जेरबंद

**नांदेड/ प्रतिनिधी**

पोलिसांनी जिल्ह्यात तीन जुगारींना पकडले आहे. हदगाव शहरातील बाजार गल्लीतील नगर पालिकेच्या टीन शेडमध्ये दोघे जण विनापरवाना कल्याण क्लोज, कल्याण ओपन मटका जुगार खेळत व खेळवत होते. ही माहिती मिळाल्यावर उपनिरीक्षक दिगंबर पाटील यांनी तेथे धाड टाकली. या धाडीत दोघांकडून जुगाराचे साहित्य व ८५०५ रुपये जप्त करण्यात आले. पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हदगाव पोलिस ठाण्यात गुरनं ३५०/२२ दाखल करण्यात आला आहे. पोहेकॉ हंबर्डे पुढील तपास करीत आहेत.

कंधार तालुक्यातील मौजे पेठवडज येथील जय हनुमान पान शॉप येथे १६ डिसेंबर रोजी मटका जुगार खेळत व खेळविला जात होता. उपनिरीक्षक गोपाल इंद्राळे यांनी धाड टाकून एका जुगारीला पकडले. त्याच्याकडून रोख १६१० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. टाईम बाजार मटका जुगार खेळताना व खेळविताना ही कारवाई करण्यात आली. इंद्राळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कंधार पोलिस ठाण्यात गुरनं ३८३/२२ दाखल करण्यात आला आहे. पोहेकॉ व्यवहारे पुढील तपास करीत आहेत.